**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ३ रुपये तर सीएनजीच्या दरात २ रुपये वाढ

- नीट युजी परीक्षा आता येत्या २१ जून रोजी होणार

- नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार

- प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचं निधन

**आणि**

- मोसमी पाऊस येत्या २६ मे रोजी केरळात येणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

जागतिक स्तरावर झालेल्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे मुंबईत साध्या पेट्रोलचा दर वाढून प्रती लीटर १०६ रुपये ६८ पैसे तर डिझेलचा दर प्रती लीटर ९३ रुपये १४ पैसे झाला आहे.

मुंबईत  सीएनजीच्या दरातही प्रतिकिलो २ रुपये वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईत सीएनजीचा दर प्रतिकिलो ८४ रुपये झाला आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे साऱ्या जगालाच इंधन दरवाढीला तोंड द्यावं लागत आहे. इतर देशांमधे इंधनाच्या दरात २० ते १०० टक्के वाढ झाली असताना भारतात केवळ 3 टक्के वाढ झाली असल्याचं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे.

इंधनाच्या दरातली वाढ केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे झाली असल्याचा आरोप राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. केंद्र सरकार जनतेला महागाईच्या संकटात लोटत असल्याचा आरोप कांग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. पश्चिम आशियातल्या संघर्षाचा परिणाम इंधनाच्या दरांवर होणार हे स्पष्ट असूनही सरकारने हालचाल केली नाही असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट युजी २०२६ ही परीक्षा येत्या २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार असल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्था– NTA ने आज जाहीर केलं. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काल रात्री झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रधान यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली . विद्यार्थ्यांना १४ जून पर्यंत प्रवेशपत्रं दिली जातील असं त्यांनी सांगितलं. परीक्षार्थींना परीक्षा शुल्काचा परतावा दिला जाईल असंही ते म्हणाले. नीट परीक्षा पुढच्या वर्षीपासून संगणक आधारित - सीबीटी पद्धतीनं घेतली जाणार आहे.

एनटीएमध्ये ठोस सुधारणा करण्याची गरज असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी परीक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असं प्रधान यांनी सांगितलं. ३ मे रोजी झालेल्या नीट प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, याचा पुनरुच्चार प्रधान यांनी केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहा दिवसांच्या संयुक्त अरब अमिराती (**UAE**)**,** नेदरलँड्स**,** स्वीडन**,** नॉर्वे आणि इटली या पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात ते संयुक्त अरब अमिरातींत राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नह्यान यांची भेट घेणार आहेत. दुबई इथं प्रधानमंत्र्यांचं पारंपरिक मानवंदना देऊन स्वागत करण्यात आलं. दौऱ्यादरम्यान भारताचे विविध देशांसोबत द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

**<><><><><>**

नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज साताऱ्यात केली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या अंतर्गत ५ लाख घरांच्या वितरणाच्या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात ६ लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढच्या आठवड्यात बैठक घेण्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं

येत्या ५ वर्षात राज्याला बेघरमुक्त करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. वर्षभरात ५ लाख घर बांधून पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - -**

सातारा पालिकेनं उभारलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झालं.

**<><><><><>**

शिर्डी इथं दारुगोळा निर्मिती कारखान्याचं उद्घाटन येत्या २३ मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी निबे समूहाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे यांनी वार्ताहर परिषद घेतली.

अहिल्यानगर जिल्ह्यात उभारलेल्या या प्रकल्पात तोफांसाठी लागणारे स्फोटक पदार्थ तयार करण्यात येणार असून, हवाई क्षेत्रालाही या युनिटमधून मदत मिळणार आहे. श्रीगोंदा इथं २५ हजार टन क्षमतेचा दारुगोळा उत्पादन कारखाना उभारण्याची योजनाही असल्याचं निबे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विमानाच्या तिकीट दरांमध्ये सुसूत्रता आणून केंद्र सरकारने प्रवाशांना दिलासा द्यावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. एकाच दिवशी एकाच मार्गावर उड्डाण करणारी एक विमान कंपनी तिकीटाला एक दर आकारते तर त्याच मार्गावरच्या विमानासाठी दुसरी कंपनी वेगळा दर आकारत असल्याचं निरीक्षणही न्यायालयानं यावेळी नोंदवलं. नागरी विमान वाहतूक क्षेत्रात पारदर्शकता आणि प्रवाशांचं संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी एका सक्षम आणि स्वतंत्र नियामकाची मागणी करणारी याचिका एका सामाजिक कार्यकर्त्यांनी दाखल केली होती. भारतातल्या खासगी विमान कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या तिकीटाच्या दरांमधली तफावत तसंच अनपेक्षित दरवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वं निश्चित करण्याची मागणीही या याचिकेत करण्यात आली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ आणि लेखक डॉ.आनंद नाडकर्णी यांचे आज सकाळी मुंबईतील एका रुग्णालयात प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर ठाण्यात अंत्यसंस्कार होणार आहेत.

एम.बी.बी.एस ची पदवी घेतल्यानंतर डॉ. नाडकर्णी यांनी मानसोपचारशास्त्रामध्ये एम.डी. केलं. व्यसनमुक्ती, तरुण आणि किशोरांची जडणघडण या क्षेत्रात त्यांनी जनजागृतीचं भरीव कार्य केलं. त्याकरता बदलत्या काळात मानसोपचार आणि समुपदेशनाचं महत्त्व पटवून देणारे अनेक अभिनव उपक्रम त्यांनी राबवले. डॉ. नाडकर्णी यांच्या निधनाबद्द सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मानसोपचाराला सामाजिक बांधिलकी मानून दीपस्तंभासारखं कार्य करणाऱ्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. मानवी मनाचा वेध घेत समाजाला मानसिक आरोग्य, संवेदनशीलता आणि सकारात्मकतेची दिशा देणारा एक अभ्यासू आणि माणुसकी जपणारा आवाज आज आपल्यातून निघून गेला असल्याची भावना **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांनी व्यक्त केली. मानसिक आरोग्य क्षेत्रात त्यांनी केलेलं काम समाजासाठी कायम प्रेरणादायी असेल, अशा शब्दांत **उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार** यांनी आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात हडपसर इथं एका रुग्णालयात टायमर बॉम्बसदृश स्फोटक ठेवल्याप्रकरणी नागपूर रेल्वे जंक्शन परिसरातून पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकानं एकाला अटक केली. अटक केलेल्या व्यक्तीची कसून चौकशी केली जात आहे.

हडपसर इथल्या उषाकिरण रुग्णालयात पहिल्या मजल्यावर स्वच्छतागृहात दोन दिवसांपूर्वी बॉम्ब सदृश वस्तू आढळून आल्यानं खळबळ उडाली होती.

**<><><><><>**

यंदा केरळमध्ये नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन २६ मे च्या दरम्यान होईल असा अंदाज आज हवामानखात्यानं वर्तवला आहे. साधारणपणे नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये एक जूनच्या दरम्यान पोचतो, गेल्यावर्षी मात्र तो २४ मे च्या दरम्यान केरळात दाखल झाला होता. यंदाही तो दरवर्षीपेक्षा लवकर केरळात पोचेल असं हवामानखात्यानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्जमध्ये सामना होईल. लखनौमध्ये आज साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

**//<><><><><>//**